स्वातंत्र्य सैनिकांचा वारसांना अनुज्ञेय असलेले लाभ व अनुषंगिक अटीबाबतची माहिती देण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय, क्रमांक: संकीर्ण-२००७/प्र.क्र.१३०/०७/स्वासैक-१

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक :-१२/३/२००९

वाचा :-

१) शासन निर्णय सा.प्र.वि.सीएनएस१०८७/४९९/के.नं.१२/१६अ, दिनांक ४ मार्च, १९९९१

२) शासन परिपत्रक क्र. पीओएस२०००/२९७/प्र.क्र.३५/स्वासैक-१ दिनांक २३ मे,२०००

३) शासन परिपत्रक क्र.न्याप्र-१००३/प्र.क्र.२/०३(भाग-२)११अ दिनांक २५ ऑक्टोबर,२००५

परिपत्रक

स्वातंत्र्य सैनिकाने देशासाठी केलेले बलिदान व त्याग लक्षात घेऊन स्वातंत्र्य सैनिकांना मिळणा-या सोयी सवलतीबाबत तसेच स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना नोकरीसाठी करण्यात येणा-या नामनिर्देशनाबाबत वेळोवेळी शासन स्तरावरुन शासन निर्णय तसेच परिपत्रके निर्गमित केली आहेत. तथापि, शासनाच्या आता असे निदर्शनास आले की, काही जिल्हाधिकारी / तहसीलदार कार्यालयात स्वातंत्र्य सैनिकांना मिळणारे लाभ व अनुषंगिक अटी व शर्तीची माहिती उपलब्ध नसते. त्यामुळे स्वातंत्र्य सैनिक तसेच त्यांचे पाल्य हे मिळणा-या लाभापासून वंचित होतात. यास्तव स्वातंत्र्य सैनिकांना योग्य ते मार्गदर्शन मिळण्यासाठी शासन खालीलप्रमाणे सूचना देत आहे :-

१) शासकीय कार्यालयात येणा-या स्वातंत्र्य सैनिकाचे म्हणणे काळजीपूर्वक ऐकून घ्यावे व त्यांना नियमानुसार शक्य तेवढी मदत / मार्गदर्शन करावे.

२) स्वातंत्र सैनिकांच्या विधवांना / पाल्यांना देय असलेल्या सोयी सूविधा, त्याकरीता असलेले निकष अटी याबाबतची एकत्रित माहिती जिल्हाधिकारी /

तहसीलदार कार्यालयाच्या फलकावर लावावी या माहितीपुस्तिकेची छपाई करण्यात यावी. तसेच सदर माहिती वेबसाईटवर प्रस्तुत करावी.

वरील सूचनांचे पालन काटकोरपणे करण्यात यावे..

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( स्मि.द.मंत्री )
उप सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) सर्व मा. मंत्री /मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) सभापती /सदस्य सचिव, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती,
५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञयता), महाराष्ट्र - १, मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,
६) महालेखापाल (लेखा व परिक्षा ), महाराष्ट्र - १,मुंबई/महाराष्ट्र-२, नागपूर,
७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
८) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
९) सर्व विभागीय आयुक्त,/ जिल्हाधिकारी / कोषागार अधिकारी,
१०) महासंचालक माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय,मुंबई (प्रसिध्दीपत्रक काढण्यासाठी)
११) सर्व मंत्रालयीन विभाग/सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग,प्रमुख,कार्यालय प्रमुख
१२) सामान्य प्रशासन विभाग, का..क्र.२१/२३-अ/२४/२६, मंत्रालय,मुंबई
१३) निवड नस्ती (२ प्रत)